पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/स्वीस/१११/२०१९
दिनांक: ०१ /०८/२०१९

प्रति,
मा.

सदस्य/सदस्या क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नेहरुनगर,भोसरी-२६.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०७/०८ /२०१९ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१९ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रिय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे, सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक- २७**

दिनांक- ०७/०८/२०१९ वेळ- दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१९ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्र.१ : मा.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र इक्षेका/प्रशा/४/कावि/७०/२०१९ दिनांक २९/०७/२०१९

मनपाच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करीत असताना क क्षेत्रिय प्रशासन विभागा करीता इतर खर्च या लेखाशिर्षामध्ये र.रु. १७,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. सदर तरतूद मधून सन २०१८-१९ ची इतर खर्चाची बिले खर्ची टाकणेत आलेली आहेत. त्यामुळे माहे जुलै २०१९ अखेर र.रु. ३६६/- तरतूद शिल्लक आहे. त्यामुळे सदरची तरतुद कमी पडणार आहे. त्याकरीता छपाई या लेखाशिर्षावर र.रु. ६०,०००/- तरतूद असून त्या पैकी र.रु. ५०,०००/- तरतूद इतर खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२ : मा.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक इक्षेका/प्रशा/३/कावि/३२३/२०१९ दिनांक ३१/०७/२०१९

पेठ क्र.२ इंद्रायणीनगर येथील भाजी मंडई गाळे वितरणाबाबत अटो क्लस्टर येथे दिनांक ६/२/२०१९ रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये मनपाने प्रसिध्द केलेल्या प्रभाग कार्यालया अंतर्गत येणाऱ्या पेठ क्र.२ इंद्रायणीनगर येथील भाजी मंडई गाळे/ ओटे सध्यस्थितीत जे व्यावसायीक वापरत आहेत त्यांनाच देण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार त्या त्या प्रभाग स्तरावर स्थानिक प्रशासनाने बसणा-या भाजी विक्रत्यांचे सर्व्हेक्षण करून अंतिम यादी करावी व त्यास प्रभाग समितीची मान्यता घेउन भुमिजिंदगी विभागाकडे सादर करावे असे मा.आयुक्त यांचे पत्र क्रं.भूजि/३/कवि/१४४ /२०१९ दिं.०६/०६/२०१९ अन्वये कळविलेले आहे. तसेच सदर विषयास मा.स्थायी समिती सभा ठराव क्रं.४६९४ दिंनाक २८/२/२०१९ व ठराव क्रं.४६९७ दिंनाक २८/२/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार प्रभाग कार्यालया अंतर्गत सदर प्रभागातील भाजी/ फळ विक्रेते यांचे सर्व्हेक्षण करणेत आलेले असून त्याची यादी (प्रपत्र अ) तयार करणेत आलेली आहे. सदरच्या यादीस मा.प्रभाग समितीची मान्यता देउन भुमि जिंदगी विभागाकडे सादर करणेबाबत विचार करणे.

याशिवाय मा.सभापती यांचे मान्यतेने घेणेत येणारे ऐनवेळचे विषय

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/प्रशा/स्वीस/१११ /२०१९
दि. ३१ /०८/२०१९